**वाचा :-** 1) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक यांचे आदेश क्र.आरोग्य्/आस्था-5/1330/2017,दि.16/10/2017
2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक यांचे कडिल मंजूर टिपणी दि. 14 /09/2018

---

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
**आरोग्य विभाग**
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/716/2018
नाशिक दिनांक- 14 / 09 /2018

**आदेश**

आरोग्य विभाग जिल्हा परिषद नाशिक मार्फत अनेक महत्वाच्या योजनांची व आरोग्य् सेवा सुविधांची अंमलबजावणी करण्यात येते . त्याकरीता गट स्तरावर तालुका आरोग्य् अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त् असलेल्या सर्व आरोग्य् कर्मचारी यांचे कडून कामकाज दिलेल्या मुदतीत करावयाचे आहे. तालुका आरोग्य् अधिकारी यांचेकडे आस्थापना विषयक अधिकार दिनांक 16/10/2017 चे आदेशान्वये सोपविलेले आहे. त्यानुसार त्यांना त्यांचे अधिनस्त् सर्व आरोग्य् कर्मचारी यांच्या सर्व प्रकारच्या रजा मंजूरीचे अधिकारी प्रदान केलेले आहे.

तथापी आरोग्य विषयक ANC Registration , 12 Week Registration, ANC TT2/B, 180 IFA Tablets, 4 ANC visit, Measles 2nd dose, DPT Booster, OPV Booster अशा प्रकारची महत्वाची कामे ही दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन घेण्याकरीता या आदेशानुसार गटातील सर्व आरोग्य् कर्मचारी यांची केवळ किरकोळ रजा मंजूरीचा अधिकार हे तालुका आरोग्य् अधिकारी यांना कायम ठेवण्यात येत आहे. तथापी अर्जितरजा, वैद्यकिय कारणास्तवची परावर्तीत् रजा मंजूरीचे अधिकार काढुन घेण्यात येत आहे.

तालुकास्तरावरील आरोग्य् विभागांतर्गत् कार्यरत आरोग्य् कर्मचारी यांची अर्जित रजा , वैद्यकिय कारणास्तवची परावर्तीत रजा तसेच दिर्घ मुदतीची कोणत्याही प्रकारची रजा ही तालुका आरोग्य् अधिकारी यांनी यापुढे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी आरोग्य् विभाग, जिल्हा परिषद नाशिक या मुख्यालयी योग्य् त्या शिफारशीसह सादर करावयाची आहे . त्यावर जिल्हा आरोग्य् अधिकारी यांनी अर्जाचा नियमानुसार विचार करुन रजा मंजूरीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावयाची आहे.

सदर आदेशाची आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलबाजवणी करण्यात यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नासिक**

**प्रति तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती , -------- ( सर्व ).जि.नाशिक**
प्रत- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र ------------ (सर्व) ,जि.नाशिक
प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती -------------- (सर्व), जि.नाशिक
प्रत- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जि.प.नाशिक
प्रत- माहिती व प्रसिध्द कक्ष साप्रवि जिल्हा परिषद नाशिक यांना जिल्हा परिषद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.